VOLUME - VIII, ISSUE - II - MARCH - AUGUST - 2020
IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 6.601 (www.sjifactor.com)

# १. स्वामी - एक आकलन

**डॉ. वैजयंती दिलीप पेशवे**
असोसिएट प्रोफेसर, कमला नेहरू महाविद्यालय, नागपूर.

मराठी माणसाला इतिहासाने नेहमीच वेड असलेले दिसून येते. मराठेशाहीचा दैदिव्यमान इतिहास आणि मराठी भाषेत निर्माण झालेली दीर्घ साहित्य परंपरा यामुळे ही आवड निर्माण झाली. या दोन्हीचा सुंदर मेळ म्हणजे ऐतिहासिक कादंबरी! हरी नारायण आपटयांनी सुरू केलेली ऐतिहासिक कादंबरीची परंपरा आजपर्यंत सुरू आहे. या ऐतिहासिक कादंबऱ्यामध्ये महत्वाची व अतिशय गाजलेली कादंबरी म्हणजे रणजित देसाई यांची 'स्वामी' ही कादंबरी! रणजित देसाईनी १९६२ मध्ये ही कादंबरी लिहीली. पानिपताच्या युद्धात मराठयांचा दारूण पराभव झाला; प्रचंड हानी झाली. त्यानंतर अवघे सोळा वर्ष वय असलेले माधवराव पेशवे पदावर नियुक्त झाले. केवळ अकरा वर्षाच्या तेजस्वी कारकीर्दीत त्यांनी मराठयांचे राज्य पुन्हा ताकदीने उभे केले. युद्धात हरवलेला मुलुख पुन्हा मिळवला. राज्यकारभाराची घडी पुन्हा नीट बसवली. स्वदेशी कारखाने उभे केले. प्रजेची काळजी वाहीली. एवढे कतृत्व गाजवून अल्पायुषी ठरलेल्या माधवराव पेशव्यांच्या जीवनाची कहाणी हे स्वामी या कादंबरीचे कथानक आहे. अत्यंत परिणामकारक वातावरण निर्मिती, प्रभावी व्यक्तिचित्रण आणि सखोल संशोधनावर आधारित वास्तवाला कल्पनेने फुलवल्यामुळे ही कादंबरी मनाचा वेध घेते. एका तेजस्वी आणि सद्गुणी शासन कर्त्याचे कतृत्व आणि त्याचा करूण अंत यामुळे ही कादंबरी वाचकांच्या मनाला चटका लावून जाते.

'स्वामी' या कादंबरीने रणजित देसाईना इतकी लोकप्रियता मिळवून दिली की देसाई 'स्वामी' कार झाले. स्वामी ने एक इतिहास घडवला. ड्वाईगच्या "मेरी क्वीन ऑफ स्कॉट्स" व मेरी ॲटोनेटो या चरित्रावरून देसाईना ही कादंबरी सुचली. त्याला आशिर्वाद मिळाला वि.स. खांडेकरांचा. थोरल्या माधवराव पेशव्यांच्या जीवनावार 'अजिंक्य' नावाची कादंबरी लिहिण्याचा त्यांचा मानस होता. पण प्रकृती अस्वास्थामुळे त्यांना ते शक्य झाले नाही म्हणुन त्यांनी 'अजिंक्य' या कादंबरीसाठी गोळा केलेली सगळी साधन सामग्री रणजित देसाई कडे सुपूर्त केली त्यानंतर दोन वर्ष प्रदीर्घ अभ्यास करून रणजित देसाईनी या कादंबरीचे लेखन केले.

स्वामी ही ऐतिहासिक कादंबरी एकाच वेळी इतिहासही आहे आणि कादंबरीही आहे. माधवराव पेशव्यासारखी पराक्रमी, विचारी, मुत्सदी, आक्रमक, चारित्र्यशील, रसिक, विनयशी, प्रेमळ, गुणी विवेकी आणि संयमी व्यक्तिमत्व असणाऱ्या माधवराव पेशव्यांना नायकत्व देण्याचा मोह एखाद्या प्रतिभावंताला झाला तर त्यात काही वावगे नाही. इतिहासकार ग्रँट डफ म्हणतो, माधवरावांचा मृत्यु हा पानिपतावरील मराठयांच्या पराभवापेक्षाही अधिक जबर असा मराठी साम्राज्यावरील आघात होय.